राष्ट्रीय कौशल्य विकास अभियानांतर्गत "उपजिविकेसाठी कौशल्य संपादन व ज्ञान जागरूकता अभियान (The Skill Acquisition & Knowledge Awareness for Livelihood Project-SANKALP)" राज्यात राबविणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: कौविउ-२०१७/प्र.क्र.१८७/अभियान-१,**
**दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**दिनांक : ३० ऑगस्ट, २०१९**

**संदर्भ :** सह सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक B-12011/48/2015-SDE, दिनांक १५/०९/२०१७.

**प्रस्तावना :**

देश व राज्य पातळीवर संस्थात्मक यंत्रणा मजबूत करणे, दर्जेदार प्रशिक्षकांचा समूह तयार करणे, राज्य स्तरावर राबविण्यात येणाऱ्या सर्व कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांचे केंद्रीयकरण करणे, कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांचे संनियंत्रण व मुल्यमापन करण्यासाठी प्रभावी यंत्रणा निर्माण करणे, सामाजिकदृष्टया मागासवर्गासाठी कौशल्य प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, मेक इन इंडीया या संकल्पनेस पुरक सहाय्य करण्यासाठी उत्पादन क्षेत्राकरिता आवश्यक कौशल्ययुक्त मनुष्यबळ निर्माण करणे या उद्देशांसाठी केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयामार्फत National Skill Development Mission अंतर्गत "उपजिविकेसाठी कौशल्य संपादन व ज्ञान जागरूकता अभियान (The Skill Acquisition & Knowledge Awareness for Livelihood Project-SANKALP)" राबविण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचा कालावधी ०६ वर्षे असून प्रकल्प खर्चातील केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा ६० : ४० प्रमाणात असणार आहे. या संदर्भातील प्रस्ताव दिनांक २०/०८/२०१९ रोजी मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. मा.मंत्रिमंडळाने दिनांक २०/०८/२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार सदर प्रकल्प राज्यात राबविण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्य पातळीवर संस्थात्मक यंत्रणा मजबूत करणे, दर्जेदार प्रशिक्षकांचा समूह तयार करणे, राज्य स्तरावर राबविण्यात येणाऱ्या सर्व कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांचे केंद्रीकरण करणे, कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांचे संनियंत्रण व मुल्यमापन करण्यासाठी प्रभावी यंत्रणा निर्माण करणे, समाजातील मागास व दुर्लक्षित घटकांसाठी कौशल्य प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, मेक इन इंडीया या संकल्पनेस पुरक सहाय्य करण्यासाठी उत्पादन क्षेत्राकरिता आवश्यक कौशल्ययुक्त

मनुष्यबळ निर्माण करणे तसेच समाजातील मागास/दुर्लक्षित घटकांचा (जसे की, अनुसूचित जाती/जमाती, महिला, अपंग) कौशल्य विकास करणे याकरिता वरील प्रस्तावामध्ये नमूद केल्यानुसार शासन याद्वारे, केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयामार्फत National Skill Development Mission अंतर्गत राबविण्यात येणारा "उपजिविकेसाठी कौशल्य संपादन व ज्ञान जागरूकता अभियान (The Skill Acquisition & Knowledge Awareness for Livelihood Project-SANKALP)" प्रकल्प राज्यात राबविण्यास मान्यता देत आहे.

२. सदर प्रकल्प खालील पद्धतीने राबविण्यात येईल.

१) सदर प्रकल्पाचा कालावधी ०६ वर्षांचा राहील.

२) सदर प्रकल्पांतर्गत होणाऱ्या खर्चाचा केंद्र व राज्य हिस्सा ६० : ४० प्रमाणात राहील.

३) सदर प्रकल्पाच्या अर्थसहाय्याच्या हिश्शेवारीनुसार राज्य शासनाने उपलब्ध करुन द्यावयाच्या ४०% निधीची तरतूद राज्याच्या अर्थसंकल्पात करण्यात येईल.

४) सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करणे तसेच राज्याच्या अर्थसंकल्पात वेळोवेळी तरतूद करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव विहित कालावधीत शासनास सादर करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांची राहील.

५) प्रकल्प कालावधीत प्रत्येक वर्षाकरिता केंद्र शासनास सादर करावयाचा प्रकल्प आराखडा विहित कालावधीत कौशल्य विकास व उद्योजकता विभागास सादर करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांची राहील.

६) केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करुन प्रकल्प राबविण्याची खबरदारी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांनी घेणे आवश्यक राहील.

७) सदर प्रकल्प राबवितांना कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडे अस्तित्वात असलेल्या अथवा प्रस्तावित इतर राज्य योजनांमधील कामांची द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीने घ्यावी. सदर बाबीची द्विरुक्ती होत असल्यास संकल्प योजनेमध्ये ज्या बाबींचा समावेश आहे, अशा बाबी विभागाच्या राज्य योजनांमधून वगळण्याची खबरदारी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीने घ्यावी.

८) कौशल्य व उद्योजकता विकास प्रशिक्षण तसेच कौशल्य/उद्योजकता विकासाची क्षमता वृध्दींगत (Capacity Building) करण्यासंदर्भात राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची द्विरुक्ती टाळण्यासाठी राज्य शासनाच्या संबंधित विभागांनी

कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या दिनांक २०/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील कार्यपद्धतीचा अवलंब करणे आवश्यक राहील. याकरिता आवश्यक ते बदल संबंधित विभागांनी त्यांच्या शासन निर्णयात करावेत. एखाद्या बाबीची द्विरुक्ती होत असल्यास संकल्प योजनेमध्ये ज्या बाबींचा समावेश आहे, अशा बाबी विभागाच्या राज्य योजनांमधून वगळण्याची खबरदारी संबंधित विभागाने घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०८३०११०३४३०२०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Vithal Rokade

Digitally signed by Santosh Vithal Rokade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ca5751ffedbb005fdff34ab6ac1f8319d061483d7d35e20f744e251360f7920a, serialNumber=ecf4a9abe84c70de989c3669424c12b6cadcb583d500fe489ce8727916e0bbee, cn=Santosh Vithal Rokade
Date: 2019.08.30 11:17:02 +05'30'

**( संतोष रोकडे )**
अवर सचिव, महाराष्ट्र राज्य

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. सर्व मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
६. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
७. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
९. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, मुंबई
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
११. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. निवड नस्ती. (अभियान-१)